**प्रेसनोट** दिनांक ०८/०३/२०२२

**श्री. दिनेश श्रीकांत कुलकर्णी सहायक पोलीस निरीक्षक, जोडभावीपेठ पोलीस ठाणे, सोलापूर शहर यांच्यावर रु १,००,०००/- ची लाच मागणी करुन तडजोडी अंती रु ५०,०००/- लाचेची मागणी केल्यावरुन गुन्हा दाखल.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | जोडभावीपेठ पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | श्री. दिनेश श्रीकांत कुलकर्णी, वय ३२ वर्षे, सहायक पोलीस निरीक्षक, जोडभावीपेठ पोलीस ठाणे सोलापूर शहर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १,००,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु ५०,०००/- लाचेची मागणी |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | निरंक |
| **थोडक्यात माहिती** | पडताळणी दि ३१/०१/२०२२, दि.०१/०२/२०२२ व दि. ०२/०२/२०२२<br>प्राप्त तक्रारीनुसार तक्रारदार यांचा मेहुणा याचे विरुध्द जोडभावीपेठ पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे गुन्हा दाखल असुन सदर दाखल गुन्हयाचा तपास यातील आरोपी लोकसेवक दिनेश श्रीकांत कुलकर्णी हे करीत आहेत. सदर गुन्हयात तक्रारदार, त्यांची पत्नी, सासु, मोठा मेहुणा, मेहुणी व तीचा नवरा (तक्रारदार यांचा साडु) असे देखील आरोपी होत असल्याबाबत सांगुन जर त्यांना आरोपी करायचे नसेल तर तक्रारदार यांच्याकडे ०१ लाख रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५०,०००/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन वैयक्तीक सांपत्तीक फायदा मिळवण्यासाठी गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे.<br>यातील आलोसे यांना लाच मागणी केलेवरुन दि. ०८/०३/२०२२ रोजी पकडण्यात आलेले आहे.<br>यातील आरोपी लोकसेवक यांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| **मार्गदर्शन अधिकारी** | श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे<br>श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर |
| **सापळा पथक** | श्री. उमाकांत महाडीक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- पोना कोष्टी, पोशि पवार, पोशि सण्णके, चापोशि सुरवसे सर्व ने. ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल अथवा त्याच्यावतीने लाच मागणा-या खाजगी व्यक्तींबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे टोल फ्री क्रमांक १०६४ अगर दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२६६८ वर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल** - www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार ॲप** – acbmaharashtra.net

**व्हॉटस ॲप क्रमांक** – 993097700

(संजीव पाटील)
**पोलीस उपअधीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर**